आर.सी.सी. क्र.१००/२०२१

नि.क्र.३७

**सरकार पक्षातर्फे साक्षीदार क्र.३ यांचा पुरावा**

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,

माझे नांव –विठ्ठल मारुती भागवत

वय – ७४ वर्षे, व्यवसाय – शेती

राहणार – विरोली, ता.पारनेर

**सरतपासणी सहा. सरकारी अभियोक्ता श्री.एस.ए. पटेकर यांचेमार्फत**–

पोलीसांनी मला बोलवले नव्हते. मी रस्त्यावरुन जात असताना पोलीसांनी माझी को–या कागदावर सही घेतली. तो कागद मी वाचला नव्हता. त्यात काय लिहीले आहे हे माहीत नव्हते. मी पोलीसांना काय लिहीले आहे हे विचारले नाही. आता मला घटनास्थळ पंचनामा दाखवण्यात आला. त्यात काय लिहीले आहे हे माहीत नाही. त्यावर माझी अ.क्र.२ वर सही असुन त्यास ओळखीसाठी नि.३८ देण्यात येते.

**सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांनी सदर साक्षीदारास उलटतपासाच्या स्वरुपात प्रश्न विचारण्याची परवानगी मागितली असता तशी ती त्यांना देण्यात आली. सबब उलटतपास सुरु.**

हे म्हणणे खरे नाही की शेलार पोलीसांनी मला दि.२१.१२.२०२० रोजी सकाळी ८.१५ तके ८.४५ दरम्यान पंचनाम्यासाठी बोलावले होते. हे म्हणणे खरे नाही की त्यावेळी माझ्यासोबत दुसरे पंच कोंडीबा बोरुडे हजर होते. हे म्हणणे खरे नाही की पंचनामा ज्ञानेश्वर बोरुडे यांच्या गट नं.२६० मध्ये झाला होता. हे मला माहीत नाही की पंचनामा बोरुडे यांना झालेल्या मारहाणीबाबत होता. हे म्हणणे खरे नाही की पोलीसांनी माझ्यासमक्ष पंचनामा तयार करुन, तो मला वाचुन दाखवुन त्यावर माझी सही घेतली. हे म्हणणे खरे नाही की आरोपीला मदत होण्यासाठी मी खोटी साक्ष देतआहे.

**उलटतपास आरोपीतर्फे विधीज्ञ श्री.एम.बी.गायकवाड यांनी नाकारला**

श्रवणोत्तर स्वीकृती

NILESH SHRIPAL SABNIS
Digitally signed by NILESH SHRIPAL SABNIS
Date: 2025.08.05 16:37:41 +0530

(एन.एस.सबनीस)

दिनांकः ०५/०८/२०२५.

न्यायदंडाधिकारी, प्रथमवर्ग, कोर्ट नं.२,

पारनेर.

आर.सी.सी. क्र.१००/२०२१

नि.क्र.३९

**सरकार पक्षातर्फे साक्षीदार क्र.४ यांचा पुरावा**

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,

माझे नांव –जनार्दन रंगनाथ बोरुडे

वय – ६५ वर्षे, व्यवसाय –काही नाही

राहणार – विरोली, ता.पारनेर

**सरतपासणी सहा. सरकारी अभियोक्ता श्री.एस.ए. पटेकर यांचेमार्फत**–

आरोपी माझ्या गावाचा आहे. फिर्यादी माझा मुलगा आहे. काय घटना घडली व कधी घडली हे लक्षात नाही. माझ्या शेताचा गट नंबर मला सांगता येणार नाही. माझ्या मुलाचे व आरोपीचे वाद झाल्याबाबत काही माहीत नाही. वादाबाबत माझ्या मुलाने पारनेर पो.स्टे.ला केस दाखल केल्याचे माहीत नाही. केस संदर्भात पोलीसांनी माझा जबाब घेतला नव्हता.

**सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांनी सदर साक्षीदारास उलटतपासाच्या स्वरुपात प्रश्न विचारण्याची परवानगी मागितली असता तशी ती त्यांना देण्यात आली. सबब उलटतपास सुरु.**

विरोली गावात माझा गट नं.२६० असल्याबाबत मला सांगता येणार नाही व त्या गटात आरोपीचे क्षेत्र असल्याबाबत मला माहीत नाही. हे मला आठवत नाही की १९.१२.२०२० रोजी माझे व आरोपीमध्ये शेतात मेंढरे बसवण्याबाबत चर्चा झाली होती. हे मला सांगता येणार नाही की शेतात मेंढरे बसवण्याच्या कारणावरुन आरोपीने माझ्या मुलाला शिवीगाळ केली होती किंवा कसे. हे माझ्या लक्षात नाही की भांडणामध्ये माझ्या मुलाला डोक्यास गंभीर स्वरुपाची दुखापत झाली होती. हे म्णणे खरे नाही की घटनेसंदर्भात् मी आरोपीला विचारणा केली होती. आरोपीविरुध्द माझ्या मुलाने पारनेर पो.स्टे.लाकेस दाखल केल्याचे मला माहीत नाही. हे मला सांगता येणार नाही की दि.२१.१२.२०२० रोजी पोलीसांनी माझ्या सांगितल्याप्रमाणे माझा जबाब घेतला होता. आता माझ्या जबाबातील अधोरेखांकीत भाग अ दाखवण्यात आला. तसा मजकुर माझ्या जबाबात का आला हे मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की आरोपीला

वाचवण्यासाठी मी खोटी साक्ष देत आहे.

**<u>उलटतपास आरोपीतर्फे विधीज्ञ श्री.एम.बी.गायकवाड यांनी नाकारला</u>**

श्रवणोत्तर स्वीकृती

NILESH SHRIPAL SABNIS Digitally signed by NILESH SHRIPAL SABNIS Date: 2025.08.05 16:37:52 +0530

(एन.एस.सबनीस)

दिनांकः ०५/०८/२०२५. न्यायदंडाधिकारी, प्रथमवर्ग, कोर्ट नं.२, पारनेर.